महाराष्ट्र शासन, आरोग्य सेवा

# आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक

सामान्य रुग्णालय नाशिक आवार, नविन सि.बी.एस.जवळ, त्र्यंबकरोड, नाशिक

दुरध्वनी - ०२५३ - २३११२०१ / २५७५१०८ ईमेल - hfwtcnsk@gmail.com / hfwtcnsk@rediffmail.com

ISO 9001 - 2008

जा.क्र आवक् कुप्राशिके ना / 12626 - 31/18 दिनांक - 30/10/18

## जाहीर नोटीस (दरपत्रके आमंत्रण पत्र)

सुचित करणेत येते की, प्राचार्य,आरोग्य व कुंटुब कल्याण प्रशिक्षण केद्र, नाशिक या कार्यालयामार्फत सन-२०१८-२०१९ मध्ये उपलब्ध होणा-या कार्यालयीन खर्चाच्या आनुदानातुन सोबत जोडलेल्या यादीतील (प्रशिक्षण केंदाला लागणारे साहित्य ब्ल्यु स्टार वॉटर कुलर/आणि ऑक्कवागार्ड प्युरिफायर ( इलेक्ट्रीक साहित्य) तसेच सोबतच्या यादीप्रमाणे लागणारे साहित्य घेण्यासाठी) दर मागविण्याचे निश्चित केले आहे. तरी इच्छुक पुरवठाधारकांनी व्यापारी लिफाफा व खाली दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके विहित कालावधील (खालील अ.क्र. १७ नुसार) प्राचार्य,आरोग्य व कुंटूब कल्याण प्रशिक्षण केद्र जिल्हा रुग्णालय आवार,नाशिक येथे सादर करावे व पोहच प्राप्त करुन घ्यावी तसेच उपरोक्त इ.मेल द्वारे दरपत्रक,सादर केल्याचे अवगत करावे.मोहरबंद तांत्रिक व व्यापारी लिफाफा स्वतंत्र सादर करण्यात यावा.

==========================================

### दरपत्रके सादर करणा-यां पुरवठाधारकांसाठी सर्वसाधरण अटी शर्ती

१) इच्छुक पुरवठाधारकांनी बाबनिहाय (Itemwise) दरपत्रके मोहरबंद लिफाप्यात सादर करावीत.यावर सदर जाहीर नोटीस जावक क्रमांक व दिनांक व ज्या बाबीचे दर सादर केलेले आहे.त्याचे नांव असावे.

२) एका पुरवठाधारकास बाबनिहाय फक्त एक दरपत्रक सादर करण्याची मुभा आहे. कोणत्याही व्यक्ती किंवा किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये.असे थेट स्वारस्य स्वारस्य असल्यास तो हिसंबधाचा संघर्ष म्हणून समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकरण्यात येतील.उदा.जर दोन कंपन्या एकाच बाबीसाठी/प्रकल्पासाठी/निविदा सादर करणार असतील तर एक व्यक्ती जी "कंपनी एक्स"चा मालक/संचालक/भागिदार/बहुसंख्य भागधारकअसेल तीच व्यक्ती"कंपनी वाय" ची मालक/संचालक/भागिदार/बहुसंख्य भागधारक नसावी.

३) निर्माणकर्त्याचा अधिकृत विक्रेता, ठोक व्यापारी यांना दरपत्रक सादर करता येतील. दरपत्रकात पुरवठा करण्यात येणा-या बाबी बद्दलची सविस्तर माहीती जसे मॉडेल,मेक इत्यादी नमुद करणे आवश्यक आहे निर्माणकर्तो(Manufaturer)यांचे अधिकृत विक्रेता/ठोक व्यापारी असणेबाबतचे पत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) यादीत विर्निदिष्ट (प्रशिक्षण केद्रां करीता लागणारे साहित्य तसेच सोबतच्या यादीप्रमाणे लागणारे साहित्य घेण्यासाठी) पुरवठा करणे बाबतचा पुर्वानुभव दाखला जोडण्यात यावा.

५) आपल्या व्यापारी संस्थेचा वस्तु व सेवा कर क्रमांक (GST Number) प्रमाणपत्र व पॅन कार्ड छायांकित प्रत सांक्षांकित करुन जोडावी.

नाशिक जिल्हा रुग्णालय आवार,नाशिक,त्र्यंबक रोड,नाशिक पिन कोड-४२२००१.

८) यादीमधील (प्रशिक्षणार्थीना लागणारे साहित्य ब्ल्यु स्टार वॉटर कुलर/आणि ॲक्कवागार्ड प्युरिफायर ( इलेक्ट्रीक साहित्य) तसेच सोबतच्या यादीप्रमाणे लागणारे साहित्य घेण्यासाठी) आवश्यकते नुसार खरेदी केली जातील.

९) विहीत कालावधीत पुरवठा न झाल्यास शासकिय नियमानुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

१०) विहीत नमुन्यातील वस्तु व सेवा कर (GST Number) सहीत देयके स्विकारण्यात येतील. दर हे सर्व करांसहीत व उचल-ठेव हमाली पोहच खर्चासहीत असावे.

११) खरेदी केलेल्या बाबींची पोहच जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे करावी लागेल.

१२) मंजुर न्युनतम दरांवर पुरवठाधारकास पुरवठा करणे शक्य न झाल्यास व वाढीव दराने खरेदी करावी लागल्यास फरकाची रक्कम न्युनतमदरधारकाकडुन वसुल केली जाईल.

१३) दर हे अधिकतम विक्री किमंतीपेक्षा (MRP) जास्त नसावे. वस्तू व सेवांच्या दराबाबत शासकिय खरेदी बाबतच्या मार्गदर्शक सुचना,शासन निर्णय, परिपत्रक यांचे पालन करणे बंधनकारक असले.

१४) (प्रशिक्षण केदाला लागणारे साहित्यांचा पुरवठा तसेच सोबतच्या यादीप्रमाणे लागणारे साहित्य घेण्यासाठी) दर्जा हा सर्वोत्तम असावा. वस्तू हया आय एस आय मार्क किंवा आयएसआय मार्कशी समांतर दर्जाधारक असावा.

१५) इच्छुक पुरवठाधारकास कोणत्याही शासकीय विभागाने खरेदी प्रक्रियेसाठी काळया यादीत टाकले नसल्या बाबतचे प्रमाणपत्र न्यायिकेतर मुद्रांकावर (स्टॅम्पपेपरवर) लिहुन देणे बंधनकारक आहे.

१६) दरपत्रके स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांकपासून आठ दिवस दिनांक ०६/११/ २०१८ संध्याकाळी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यत असेल (कार्यालयीन सुट्टी वगळुन) उशिरा प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१७) दरपत्रके उघडण्याची तारीख १३/११/२०१८ संध्याकाळी १२. वा.किंवा या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली जाईल.

१८) दरपत्रकासोबत सादर करण्यात येणारे दस्तावेज (कागदपत्रे) राजपत्रित अधिकारी किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याकडुन साक्षांकित करुन सादर करावे.

१९) न्युनतम दरधारकाने पुरवठाआदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अनामत रक्कम रुपये-दहा हजाराचा डिमांड ड्राप्ट मुख्य प्रशासकिय अधिकारी,आरोग्य व कुटुंब कल्यण प्रशिक्षण केद्र नाशिक यांच्या नांवे सादर करावा. (अ.क्र.१६ नुसार बॅक सिक्युरीटी डिपॉजिट दिल्यास अनामत रक्कमेचया धनाकर्षाची गरज नाही.)

२०) कोणतेही लेखी तोंडी कारण नदेता दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा संपुर्ण अथवा भागश:खरेदी प्रक्रिया रद्द् करण्याचा व खरेदीचे सर्व अधिकार प्राचार्य,आरोग्य व कुंटुब कल्याण प्रशिक्षण केद्र नाशिक यांनी राखून ठेवले आहेत. मान्य न्युनतम दर सहा महिने( ३६५ दिवस ) वैध राहतील.

प्राचार्य,
आरोग्य व कुंटुब कल्याण प्रशिक्षण केद्र ,नाशिक

प्रत-सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीस्तव सविनय सादर.
मा.सहसंचालक,खरेदी कक्ष,आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
प्रत-मा.जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक.
प्रत-मा.उपसंचालक,आरोग्य सेवा नाशिक मंळड नाशिक.
प्रत-मा.कोषागार अधिकारी,लेखा व कोषागरे कार्यालय,नाशिक.
प्रत-महाव्यवस्थापक (जिल्हा उघोग केंद्र) नाशिक.

# व्यापारी लिफाफा

(प्रशिक्षणार्थीना लागणारे साहित्य ( इलेक्ट्रीक साहित्य खरेदी) तसेच सोबतच्या यादीप्रमाणे लागणारे साहित्य घेण्यासाठी)

| अ. क्र. | वस्तुचे नांव / साहित्याचे नाव | वस्तुचे मार्क (कंपनी | एका नगांची किंमत | एकुण दर | जीएसटी | फायनल दर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ब्ल्यु स्टार वॉटर कुलर ( १०० लिटर) | ब्ल्यु स्टार | | | | |
| २ | ॲक्कवागार्ड प्युरिफायर | | | | | |

१) दरपत्रके सिलबंद करुन प्रशासकीय कार्यालय, प्राचार्य,आरोग्य व कुंटुब कल्याण प्रशिक्षण केद्र नाशिक, येथे पाठविण्यात यावे.
२) वरिल यादीतील नित्यउपयोगित वस्तु हया आवश्यकतेनुसर खरेदी करण्यात येईल.
३) दरपत्रके मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार प्राचार्य,आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केद्र,नाशिक यांनी राखून ठेवलेले आहेत .

सही
पुरवठा धारकांचे नांव...........
पुरवठा संस्थेचे नांव............
पत्ता....................